# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** मंजूर विकास योजना (सुधारीत)- नागपूर

**{नगर रचना विभाग}** मौजा- सिताबर्डी, कामठी रोड येथील पाटणी ऑटोमोबाईल ते एल.आय.सी चौकापर्यंत नागपूर -जबलपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ वरील विकास योजनेतील प्रस्तावित असलेला ३०.०० मी रंदीचा रस्ता ३३.०० मी. रुंद करण्यास्तव या रस्त्याच्या रुंदीकरणाकरीता बाधीत खाजगी जागांचे भूसंपादन करण्यासाठीच्या लागणा-या खर्चाच्या अनुषंगाने महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानाअंतर्गत प्रस्ताव सादर करणे व म.न.पा. हिस्साबाबत हमी देणेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेतील नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ वरील मौजा- सिताबर्डी, कामठी रोड येथील पाटणी ऑटोमोबाईल ते एल.आय.सी चौकापर्यंत विकास योजनेतील प्रस्तावित असलेला ३०.०० मी रुंदीचा रस्ता ३३.०० मी. रुंद विकास योजना रस्ता रुंदीकरणाकरीता प्रस्ताव शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम – १९६६ चे कलम ३७(२) अन्वये फेर बदलाचा प्रस्ताव दि २५.०१.२०२३ रोजी मंजूर केलेला आहे. तसेच उक्त रस्ता रुंदीकरणाखालील जागेच्या भूसंपादनाकरीता नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पून:स्थापना आणि पूनर्वसन अधिनियम, २०१३ मधील कलम १९ (१) अन्वये मा. जिल्हाधिकारी यांचेकडे भूसंपादन प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने निवाडयाची अंदाजित रक्कम रु. ३०,०८,३१,१२९/- उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, नागपूर (शहर) यांनी दि. २७.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

विकास योजनेतील सदर नागपूर जबलपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ वरील सदर रस्ता रुंदीकरणामुळे बाधीत होणारी जागा मनपास संपादन करणे आवश्यक असल्यामुळे नगर भुमापन विभागाचे संयुक्त मोजणी नकाशा अ व ब प्रत नूसार एकुण १४ खाजगी मालकीच्या भूखंडाचे क्षेत्र १५६०.७४ चौ.मी. तसेच १ सरकारी जागा व ना.सु.प्र. कडीलजागा असे एकूण ३०.६१ चौमी क्षेत्र बाधीत होत आहे याप्रमाणे एकूण १५९१.३५ चौ.मी. जागेचे संपादन करणे आवश्यक आहे. उक्त मालमत्तांच्या संपादनाकरीता भूसंपादन अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे अंदाजित खर्च रु. ३०,०८,३१,१२९/- एवढा आहे. त्यानूसार सदर जागेच्या भूसंपादनाकरीता निधी मागणीचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत सादर करणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाच्या केंद्रीय भूपृष्ठ वाहतुक मंत्रालय अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाची जबाबदारी असलेल्या रस्त्याच्या बांधकामाकरीता भूसंपादनासाठी आवश्यक असलेला निधी संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाव्दारे (राज्यस्तर) उपलब्ध करण्याबाबत शासन निर्णय क्र. संकीर्ण - २०१७/ प्र.क्र. ६१७ / नवि - ३३, दि ०४.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानूसार रस्ता रुंदीकरणाअंतर्गत भूसंपादनाकरीता लागणा-या एकुण खर्चापैकी महानगरपालिकेचा ३०% हिस्साची तरतुद करणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ वरील एल.आय.सी चौक ते पाटणी ऑटो मोबाईल चौक पर्यत रस्ता रुंदीकरणाकरीता भूसंपादनास्तव सुमारे रु. ३०,०८,३१,१२९/- खर्च अपेक्षित असल्याने यापैकी शासन निर्णयानूसार महानगरपालिकेच्या ३०% हिस्सा खर्च करणेस हमी देणेबाबतचा प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे .

(सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे)

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 349/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 17/04/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपसंचालक, नगर रचना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मंजूर विकास योजना (सुधारीत)- नागपूर, मौजा- सिताबर्डी, कामठी रोड येथील पाटणी ऑटोमोबाईल ते एल.आय.सी चौकापर्यंत नागपूर -जबलपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ वरील विकास योजनेतील प्रस्तावित असलेला ३०.०० मी रंदीचा रस्ता ३३.०० मी. रुंद करण्यास्तव या रस्त्याच्या रुंदीकरणाकरीता बाधीत खाजगी जागांचे भूसंपादन करण्यासाठीच्या लागणा-या खर्चाच्या अनुषंगाने महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानाअंतर्गत प्रस्ताव सादर करणे व म.न.पा. हिस्साबाबत हमी देणेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेतील नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ वरील मौजा- सिताबर्डी, कामठी रोड येथील पाटणी ऑटोमोबाईल ते एल.आय.सी चौकापर्यंत विकास योजनेतील प्रस्तावित असलेला ३०.०० मी रुंदीचा रस्ता ३३.०० मी. रुंद विकास योजना रस्ता रुंदीकरणाकरीता प्रस्ताव शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम – १९६६ चे कलम ३७(२) अन्वये फेर बदलाचा प्रस्ताव दि २५.०१.२०२३ रोजी मंजूर केलेला आहे. तसेच उक्त रस्ता रुंदीकरणाखालील जागेच्या भूसंपादनाकरीता नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पून:स्थापना आणि पूनर्वसन अधिनियम, २०१३ मधील कलम १९ (१) अन्वये मा. जिल्हाधिकारी यांचेकडे भूसंपादन प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने निवाडयाची अंदाजित रक्कम रु. ३०,०८,३१,१२९/- उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, नागपूर (शहर) यांनी दि. २७.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

विकास योजनेतील सदर नागपूर जबलपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ वरील सदर रस्ता रुंदीकरणामुळे बाधीत होणारी जागा मनपास संपादन करणे आवश्यक असल्यामुळे नगर भुमापन विभागाचे संयुक्त मोजणी नकाशा अ व ब प्रत नूसार एकुण १४ खाजगी मालकीच्या भूखंडाचे क्षेत्र १५६०.७४ चौ.मी. तसेच १ सरकारी जागा व ना.सु.प्र. कडीलजागा असे एकूण ३०.६१ चौमी क्षेत्र बाधीत होत आहे याप्रमाणे एकूण १५९१.३५ चौ.मी. जागेचे संपादन करणे आवश्यक आहे. उक्त मालमत्तांच्या संपादनाकरीता भूसंपादन अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे अंदाजित खर्च रु. ३०,०८,३१,१२९/- एवढा आहे. त्यानूसार सदर जागेच्या भूसंपादनाकरीता निधी मागणीचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत सादर करणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाच्या केंद्रीय भूपृष्ठ वाहतुक मंत्रालय अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाची जबाबदारी असलेल्या रस्त्याच्या बांधकामाकरीता भूसंपादनासाठी आवश्यक असलेला निधी संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाव्दारे (राज्यस्तर) उपलब्ध करण्याबाबत शासन निर्णय क्र. संकीर्ण - २०१७/ प्र.क्र. ६१७ / नवि - ३३, दि ०४.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानूसार रस्ता रुंदीकरणाअंतर्गत भूसंपादनाकरीता लागणा-या एकुण खर्चापैकी महानगरपालिकेचा ३०% हिस्साची तरतुद करणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ वरील एल.आय.सी चौक ते पाटणी ऑटो मोबाईल चौक पर्यत रस्ता रुंदीकरणाकरीता भूसंपादनास्तव सुमारे रु. ३०,०८,३१,१२९/- खर्च अपेक्षित असल्याने यापैकी शासन निर्णयानूसार महानगरपालिकेच्या ३०% हिस्सा खर्च करणेस हमी देणेबाबतचा प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**

**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**

**प्रशासक**

**नागपूर महानगरपालिका, नागपूर**